# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/11/2022 (बुधवार) दुपार

---

## अपघातात मृत्यु

१) पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील हरणाकुड नाला समोर, एनएच ४४ हायवे येथे दिनांक ०७/११/२०२२ चे २३.०० वा. ते २३.४० वा. सुमारास यातील अनोळखी पुरूष मृतक हा नागपुर ते जबलपुर कडे जाणाऱ्या नॅशनल हायवे क्र. ४४ ने हरणाकुड नाला शिवारातुन जबलपुर कडे पायदळ जात असताना नागपुर कडुन येणारे आरोपी अज्ञात वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हे भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन पायदळ जाणाऱ्या इसमास जोरदार धडक दिल्याने मृतक याचे पायाला, हाताला व डोळयाला गंभीर मार लागल्याने मरण पावला आहे. यातील वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निश्काळजी पणाने चालविल्याने मृतकाचा मरणास कारणीभुत होत असल्याने अशा चौकशी अहवालावरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सरकारतर्फे पोलीस उपनिरीक्षक एल. एस. घोडके पोलीस स्टेशन देवलापार यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन देवलापार येथे अज्ञात आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भांदवि. सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन देवलापार करीत आहे.

२) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत १७ कि. मी. अंतरावरील घोडे फॉर्म हाउस, शेताजवळ चारगाव येथे दिनांक ०८/११/२०२२ चे ०१.०० वा. ते ०१.२० वा. सुमारास यातील ट्रक क्रमांक एम. एच–४०, ए.के–६९५३ च्या चालकाने आपल्या वाहनामध्ये वाळलेले तणस, गवत भरून डोरली वरून चारगावकडे जात असता व ट्रक क्र. डब्ल्युबी– २३/एफ–००७३ चा चालक संत्रांचे कॅरेट आपले वाहनात घेवुन चारगावकडुन डोरलीकडे जात असता नमुद घटना वेळी व ठिकाणी यातील आरोपी यांनी आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन दोन्ही ट्रक ड्रायव्हर हे साईड जवळ एकमेकास समोरासमोर बाजुने धडकले असता त्यामध्ये आयसर ट्रक एम.एच ४०/ ए.के ६९५३ चा चालक रजनीकांत रमेश टांगले, रा. गोपीवाडा हा जागीच मरण पावला व क्लिनर मंगेश पुंडलिक लोंडासे, वय २३ वर्ष हा जखमी झाला. तसेच ट्रक क्र. डब्ल्युबी–२३/एफ–००७३ चा चालक चंद्रबाबु नायडु रोहीत रॉय रा. हरणा मस्ती चेक बिहार व क्लिनर कादीर सलीम अंसारी, वय १९ वर्ष हे जखमी झाल्याचे फिर्यादीचे चौकशी अहवाला वरून सदर गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सर तर्फे पोलीस उपनिरीक्षक संतोष निंभोरकर, पोलीस स्टेशन काटोल यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३०४ (अ) भांदवि. सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन काटोल करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर